# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-२६ दिनांक - ३०/०१/२०२४

## स्वस्त दरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे भासवुन सामान्य जनतेची फसवणुक करणारा मुख्य आरोपी पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांना यश.

-------ooooo-------

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील वसई-विरार भागात स्वस्त दरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याची जाहिरात देऊन सामान्य नागरीकांची फसवणुक करणारी टोळी सक्रिय झाली होती. सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने दिनांक २६/०९/२०२२ रोजी ते दिनांक २८/०९/२०२२ रोजी पावेतो फिर्यादी संतोष ठाकुर यांना आरोपी नामे १) राम पाटील (खरे नाव रामसिंग देवरा), २) स्वप्नील हळदनकर, ३) अमोल भोईर, ४) राहुल सिंग (खरे नाव सुरज दुबे) व ५) अरविंद दुबे यांनी आपसांत संगणमत करुन फिर्यादी यांना सदनिका क्रमांक ९०४ सनसाईटस बिल्डींग, ग्लोबल सिटी, विरार प. हा स्वप्नील हळदनकर यांच्या मालकिची असल्याचे भासवुन सदनिका विक्री करण्याचा बहाणा करुन फिर्यादी यांचे कडुन ७,८३,५००/- रुपये घेवुन आजपावेतो रुमचा ताबा न देता तसेच फिर्यादी यांनी रुम करीता दिलेले पैसे परत न करता फसवणुक केलेली म्हणुन अर्नाळा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ५५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२०,४६५,४७१,३४ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयांचे अनुषंगाने पोलीस उप आयुक्त गुन्हे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये सदर गुन्हयाचा समांतर तपासा दरम्यान तांत्रीक विश्लेषण व गोपनीय बामतीदार यांचे मार्फतीने माहिती मिळवुन गुन्हयातील मुख्य आरोपीत नामे रामसिंग जालमसिंग देवरा वय २८ वर्षे, रा. बंगली रोड, बंगली हॉस्पीटल जवळ, वसई पश्चिम, ता. वसई, जि. पालघर यास दिनांक २७/०१/२०२४ रोजी ताब्यात घेण्यात आले आहे.

अटक आरोपीत यांचेकडे प्राथमिक तपास करता आरोपी रामसिंग जालमसिंग देवरा हा १) अर्नाळा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १५/२०२३ भा.द.वी.सं. कलम ४२०,३४ प्रमाणे २) तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ६७३/२०२३ भा.द.वी.सं. कलम ४२०,४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हयात पाहिजे आरोपीत असल्याचे निष्पन्न झाले असुन अटक आरोपीत याने त्याचे इतर साथिदार यांचे बरोबर आपआपसात संगणमत करुन स्वस्त दरात घर विकत घेऊ इच्छीत सामान्य नागरीकांना हेरुन त्यांची अंदाजे २ कोटी रुपयांची फसवणुक केले असल्याचे तपासात निष्पन्न होत आहे. उक्त आरोपीत याचा पुर्वइतिहास पडताळुन पाहता त्यांचे विरुध्द अशाच प्रकारे फसवणुकीचे खालील गुन्हे दाखल आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं | कलम |
|---|---|---|---|
| १ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | १५/२०२३ | भा.द.वी.सं. कलम ४२०,३४ प्रमाणे |
| २ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ४३/२०२३ | भा.द.वी.सं. कलम ४२०,३४ प्रमाणे |
| ३ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ५५/२०२३ | भा.द.वी.सं. कलम ४२०,४६५,४७१,३४ |
| ४ | तुळींज पोलीस ठाणे | ६७३/२०२३ | भा.द.वी.सं. कलम ४२०,४६८, ४७१, ३४ प्रमाणे |
| ५ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | २७९/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,३४ प्रमाणे |
| ६ | नालासोपारा पोलीस ठाणे | १७१/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ३२४,५०४, ५०६,३४ |
| ७ | नालासोपारा पोलीस ठाणे | ५५८/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,३४ प्रमाणे |

आरोपी रामसिंग जालमसिंग देवरा हा अर्नाळा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ५५/२०२३ भा.द.वी.सं. कलम ४२०,४६५,४७१,३४ प्रमाणे गुन्हयात अटक असुन अटक आरोपीत यास दिनांक ०२/०२/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहायक पोलीस आयुक्त(गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/प्रमोद बडाख, पोउपनिरी/अभिजित टेलर, उमेश भागवत, पोहवा/अशोक पाटील, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं./राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब/प्रविण वानखेडे गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष ३ तसेच सफौ/संतोष चव्हाण, नेम. सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

-------ooooo-------